आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 06/05/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 119 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# लैंगिक अत्याचाराच्या आरोपींचा 'पॅरोल' कायमचा बंद होणार!

## • मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडक निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुणे जिल्ह्यातील नसरापूर इथल्या चिमुकलीवर झालेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्या प्रकरणामुळे महाराष्ट्र संतप्त झाला आहे. या घटनेचे तीव्र पडसाद आज मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा गुन्हेगारांवर लगाम घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याबाबत नवीन कायदा करण्याचे आदेश विधी व न्याय विभागाला दिले आहेत.**



मंत्रिमंडळ बैठकीत बोलताना मुख्यमंत्र्यांनी एक धक्कादायक निरीक्षण नोंदवले. ते म्हणाले की, "लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांतील 80 ते 90 टक्के आरोपी हे आधीच त्याच गुन्ह्याखाली जेलमध्ये असतात, मात्र पॅरोलवर बाहेर आल्यावर ते पुन्हा तशाच प्रकारचे कृत्य करतात."

या गुन्हेगारांची ही साखळी तोडण्यासाठी 2014 ते 2019 या काळात राज्य सरकारने असा कठोर कायदा केला होता, जो पुढे न्यायालयाने रद्दबातल ठरवला होता. आता पुन्हा तसाच प्रभावी कायदा तयार करा, जेणेकरून नराधमांना कायद्याची कोणतीही पळवाट मिळणार नाही, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. नसरापूर घटनेतील संतापावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक झाले. "एका बापाच्या नात्याने आणि राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मलाही वाटते की अशा नराधमाला भरचौकात फाशी द्यावी, पण लोकशाहीत आपल्याला कायद्याच्या चौकटीत राहूनच कारवाई करावी लागते," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पीडितेच्या वडिलांशी स्वतः दोनदा संवाद साधल्याचे सांगत त्यांनी खात्री दिली की, या नराधमाला मृत्यूदंडाचीच शिक्षा व्हावी यासाठी सरकार पूर्ण ताकद लावेल.

या प्रकरणातील तपासाबाबत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या माध्यमातून हा खटला फास्ट ट्रॅकवर नेला जाईल. तसेच वेळेत चार्जशीट दाखल करून आरोपीला कोणतीही संधी दिली जाणार नाही. यासोबत कायद्याचा कोणताही दुरुपयोग होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जाणार आहे.

# दहावी व बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ राज्यातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेत असते. या परीक्षेची नियमावली तसेच परीक्षा व अन्य शुल्क पण हेच मंडळ निर्धारित करते. आता आज घेतलेल्या निर्णयानुसार शुल्क वाढ होणार आहे.**




जुलै-ऑगस्ट 2026 मध्ये होणाऱ्या दहावी (SSC) आणि बारावीच्या (HSC) पुरवणी परीक्षांच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील अधिकृत परिपत्रक राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी प्रसिद्ध केले असून, सुधारित शुल्काची अंमलबजावणी आगामी पुरवणी परीक्षेपासूनच केली जाणार आहे.शासकीय आदेश आणि मंडळाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीतील निर्णयानुसार हे शुल्क सुधारित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे आता पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार योजनेखालील विद्यार्थी आणि खाजगी विद्यार्थ्यांना वाढीव परीक्षा शुल्क भरावे लागणार आहे.

दहावीच्या नियमित, तंत्र विषय घेणारे आणि खाजगी विद्यार्थ्यांसाठी 570 रुपये परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले आहे. प्रशासकीय, गुणपत्रिका व प्रमाणपत्र शुल्क प्रत्येकी 20 रुपये राहणार. प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क हे शास्त्र विषयासाठी 10 रुपये, तर तंत्र विषयासाठी प्रति विषय 100 रुपये शुल्क असेल. खाजगी विद्यार्थी नोंदणी शुल्क 1,110 रुपये आणि प्रक्रिया शुल्क 100 रुपये आकारले जाईल. राज्य मंडळाने सर्व विभागीय सचिवांना या सुधारित शुल्काबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने अवगत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच हे सुधारित शुल्क मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# मनपा वतीने मधुकर दामोदर जोशी यांचा मानपत्र देऊन सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मानपत्र देऊन माझा सन्मान केला याचा आनंद आहे, परंतु त्याहून अधिक समाधान या महानगरपालिकेच्या सर्वांगीण प्रगतीकडे पाहून मिळत आहे. आजच्या घडीला अनेक महानगरपालिकांमध्ये कार्यातील समर्पकपणा आणि एकसंधता दिसून येत नाही मात्र येथे ती स्पष्टपणे जाणवते. सुखद आणि सुरक्षित निवास, सुलभ व परिणामकारक प्रवास व्यवस्था, आणि आपुलकीचा सहवास या अपेक्षा एक नागरिक म्हणून सर्वांच्या आहेत. या सर्व बाबींमध्ये येथे होत असलेली प्रगती निश्चितच आशादायक आहे, असे मधुकर दामोदर जोशी म्हणाले.**



पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तुत्वाने भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा महापालिका सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण ठरविण्यात आले होते. या धोरणानुसार आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवून शहराच्या नावलौकिकात भर घालणारे मधुकर जोशी यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य मधुरा शिंदे, शितल उर्फ विजय शिंदे, सविता आसवानी, मंदार देशपांडे, सुरेश भोईर तसेच उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

मधुकर जोशी म्हणाले, तब्बल 48 वर्षानंतर महानगरपालिकेच्या या वातावरणात पुन्हा येण्याचा योग आला, ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाची बाब आहे. या ठिकाणचे वैभव आणि प्रसन्नता केवळ भौतिक रचनेपुरती मर्यादित नसून, ती येथे कार्यरत असलेल्या प्रत्येकाच्या मनातील दृढ विश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकर्षाने जाणवते. आजचे हे बदल आणि प्रगती पाहताना विशेष आनंद होत आहे. तसेच महापालिका सभेत बोलताना नगरसदस्यांनी सखोल अभ्यास करूनच मते मांडणे अत्यंत आवश्यक आहे. अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीमुळे शहरातील विविध प्रश्न अधिक समजून घेता येतात आणि त्यांचे निराकरण अधिक सुलभ व परिणामकारक पद्धतीने होण्यास मदत होते, असे मार्गदर्शनही त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले मधूकर जोशी हे नगरपालिका असताना नगरसदस्य देखील म्हणून देखील कार्यरत होते.मानपत्राचे वाचन किरण गायकवाड यांनी केले.

# क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या बैठकीत ४ महत्त्वाचे ठराव मंजूर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला व साहित्य समितीची आढावा बैठक समितीचे सभापती कैलास कुटे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीत शहरातील क्रीडा, कला व साहित्य क्षेत्राच्या विकासासाठी चार महत्त्वाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. तसेच शहराच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक धोरणांवर सखोल व सकारात्मक चर्चा करण्यात आली.**



या बैठकीस विरोधी पक्षनेते तथा समिती सदस्य भाऊसाहेब भोईर, शाम जगताप, धर्मपाल तंतरपाळे, तानाजी बारणे,योगेश लांडगे, जितेंद्र ननावरे तसेच उपआयुक्त पंकज पाटील आणि जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

बैठकीत शहरातील नागरिक, खेळाडू, कलाकार आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी लोकाभिमुख प्रस्ताव सादर करण्यात आले. सभापती कैलास कुटे यांच्या पुढाकारातून मांडण्यात आलेल्या या प्रस्तावांद्वारे शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा उद्देश व्यक्त करण्यात आला.

शहरातील नवोदित कलाकार, विद्यार्थी व नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध भागांत 'कला केंद्र' सुरू करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या केंद्रांमधून चित्रकला, संगीत, नृत्य आणि नाट्य यांसारख्या कलांचे प्रशिक्षण दिले जाणार असून स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे शहराच्या सांस्कृतिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

महापालिकेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना 'अपघाती विमा संरक्षण' देण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक खेळाडू आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असल्याने स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विमा कवच उपयुक्त ठरणार आहे. तसेच विम्याचा प्रीमियम महापालिकेमार्फत भरण्याची सूचनाही करण्यात आली. महिलांच्या आरोग्य व सक्षमीकरणाच्या दृष्टीने शहरातील जलतरण तलाव, व्यायामशाळा आणि इतर क्रीडा सुविधांमध्ये विशेष सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला. मासिक व वार्षिक शुल्कात सवलत तसेच महिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण व सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे महिलांचा क्रीडा आणि आरोग्यदायी उपक्रमांतील सहभाग वाढण्यास मदत होईल. शहराच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने क्रीडा विभागाचे 'क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन व सांस्कृतिक विभाग' असे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. क्रीडा क्षेत्राबरोबरच कला, साहित्य, पर्यटन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. महापालिकेअंतर्गत पं. भीमसेन जोशी संगीत अकादमी (निगडी), सावित्रीबाई फुले अकादमी (बोपखेल), सार्वजनिक ग्रंथालये, स्पर्धा परीक्षा केंद्रे तसेच क्रांतिवीर चापेकर वाडा (चिंचवडगाव) यांसारख्या विविध संस्थांद्वारे सांस्कृतिक व पर्यटन क्षेत्राला चालना दिली जात आहे. या सर्व उपक्रमांना एकत्रित व सुसूत्र दिशा देण्यासाठी एकात्मिक धोरण राबविण्याची गरज असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 06/05/2026


पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भोसरी एमआयडीसीत गावठी पिस्तुलासह इसम अटकेत; पोलिसांची धडक कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : भोसरी एमआयडीसी परिसरात पोलिसांनी गस्तीदरम्यान कारवाई करत एका इसमाकडून अवैध गावठी पिस्तुल व जिवंत काडतूस जप्त केले आहे. या घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रात पुन्हा एकदा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4 मे 2026 रोजी सायंकाळी सुमारे 6.35 वाजण्याच्या सुमारास विश्वेश्वर चौक ते इंद्रायणी नगर रोडलगत माने इंजिनिअरिंग कंपनी शेजारील मोकळ्या मैदानात, महादेव मंदिराजवळ गस्त घालत असताना संशयित हालचाली आढळल्या. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी सचिन अरुण गायकवाड (वय 35, रा. बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी) यास ताब्यात घेतले.

त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी बनावटीचे पिस्तुल (किंमत अंदाजे 40,000 रुपये) आणि 1 जिवंत राऊंड (किंमत 500 रुपये) असा एकूण 40,500 रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. सदर शस्त्रास्त्र आरोपीकडे कोणत्याही परवानगीशिवाय बेकायदेशीररीत्या बाळगले असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक 230/2026 नुसार भारतीय हत्यार कायदा कलम 3(25) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37(1)(3) सह 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

या कारवाईचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जोनापल्ले करीत असून, औद्योगिक पट्ट्यातील बेकायदेशीर शस्त्रास्त्रांवर पोलिसांनी लक्ष केंद्रीत केल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात

## भरधाव कारची ट्रेलरला धडक, महिलेचा मृत्यू ; चौघे गंभीर जखमी

**पिंपरी-चिंचवड : मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर मावळ तालुक्यातील ओझर्डे हद्दीत पहाटेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. भरधाव व निष्काळजी कारचालकामुळे हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4 मे 2026 रोजी पहाटे सुमारे 4 वाजण्याच्या सुमारास कि.मी. 79/500 येथे राजस्थान येथील चालक प्रविण धन्ना सिंग (वय 28) हे ट्रेलर (GJ-27 TF-9607) चालवत मुंबईहून पुण्याकडे जात होते. त्याचवेळी पाठीमागून येणारी इरटिगा कार (MH-12 ZE-5102) चालक प्रतिक सरवदे (वय 21, रा. भोसरी, पुणे) याने भरधाव वेगात, निष्काळजीपणे वाहन चालवत ट्रेलरला जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत कारमधील सुनिता नारायण भट (वय 55, रा. विले पार्ले, मुंबई) या गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडल्या. तसेच सौदागर देवीदास गायकवाड (वय 42), बिपीन प्रजापती (वय 27, रा. म्हाळुंगे, पुणे) आणि एम. डी. नईम अकबर (वय 53, रा. नालंदा, बिहार) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अपघातात कारचालक स्वतःही जखमी झाला आहे.

या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. घटनेनंतर स्थानिकांनी आणि पोलिसांनी तातडीने मदतकार्य राबवून जखमींना रुग्णालयात हलवले.

या प्रकरणी शिरगाव परंदवडी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक 129/2026 नुसार भारतीय न्याय संहिता कलम 106(1), 281, 125(अ), 125(ब), 324(1) तसेच

मोटार वाहन कायदा कलम 184 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी चालकाविरुद्ध पुढील कारवाई सुरु आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पारखे करीत असून, एक्सप्रेसवेवरील बेदरकार वेग आणि निष्काळजी वाहनचालना पुन्हा एकदा जीवघेणी ठरत असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 06/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी आ.सुनील शेळके यांची ठाम भूमिका

## पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश”

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**वडगाव मावळ - मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या ‘शेत पाणंद रस्ते’ प्रश्नावर आमदार सुनील शेळके यांनी ठाम भूमिका घेत निर्णायक पावले उचलली आहेत. वडगाव मावळ येथे आयोजित आढावा बैठकीत त्यांनी तालुक्यातील विविध गावांतील पाणंद रस्त्यांची स्थिती, अतिक्रमण आणि नागरिकांच्या तक्रारी यांचा सविस्तर आढावा घेतला. अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे बंद पडलेले रस्ते तात्काळ खुले करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.**



या बैठकीत मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. पाणंद रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे शेतीकामात मोठ्या अडचणी येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावर आमदार शेळके यांनी तत्काळ अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रत्यक्ष जागेवर तोडगा काढण्यावर भर दिला. “नुसती चर्चा नाही, तर प्रत्यक्ष कृती” हा मंत्र त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केला.

बैठकीस उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, भूमी अभिलेख उपअधीक्षक नितीन सूर्यवंशी यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते. यावेळी घरकुल योजनेचाही आढावा घेण्यात आला असून, संबंधित समस्यांवरही त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आक्रमक आणि कृतीशील भूमिका घेत, मावळ तालुक्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आमदार सुनील शेळके सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पिंपरी-चिंचवड भाजपने नाकारला जल्लोष

## विजयाचा आनंद मोठा, पण चिमुकलीचे दुःख त्याहून मोठे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण असतानाच, पिंपरी-चिंचवड शहर भाजपने मात्र आपली सामाजिक संवेदनशीलता जपली आहे.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या मोठ्या विजयाचा कोणताही सार्वजनिक जल्लोष, फटाकेबाजी किंवा गुलाल उधळण न करता, मोरवाडी येथील मुख्य कार्यालयात अत्यंत साधेपणाने भारत माता व जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हा विजय साजरा करण्यात आला.**




पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका चिमुकलीवर झालेल्या दुर्दैवी अत्याचाराच्या घटनेमुळे शहर भाजपने हा संवेदनशील निर्णय घेतला. या घटनेचा निषेध व्यक्त करत आणि पीडितेबद्दल सहानुभूती दर्शवत पक्षाने सर्व नियोजित उत्सवी कार्यक्रम रद्द केले. मोरवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयात पश्चिम बंगालमधील विजयाचे स्वागत केवळ भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मातेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.

शत्रुघ्न बापू काटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडये यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना नेत्यांनी सांगितले की, बंगालमधील विजय हा लोकशाहीचा आणि विकासाच्या राजकारणाचा विजय आहे, मात्र पुण्यातील त्या घटनेमुळे मन सुन्न झाले असून अशा परिस्थितीत जल्लोष करणे योग्य नाही, म्हणूनच साधेपणाने हा दिवस पाळण्यात आला.

याप्रसंगी राजेश पिल्ले, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, राजू दुर्गे, सुरेश भोईर, मंदार देशपांडे, पल्लवी वाल्हेकर, संजय पटणी, विजय सिनकर, नेताजी शिंदे, नंदू कदम, देवदत्त लांडे, प्रकाश जवळकर, संजीविनी पांडे, पोपट हजारे, युवराज लांडे, निलेश अष्टेकर, शितल कुंभार, संतोष भालेराव, गोरख कुंभार, गणेश ढाकणे, अजित भालेराव यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीतील विजयाचा आदर करतानाच सामाजिक दुःखात सहभागी होऊन भाजपने शहरवासीयांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968